MHBI060025372020

## आदेश नि. क्र. ११ खाली

अर्ज नि. ११ हा वादी व प्रतिवादी यांनी सुयुक्तीकरित्या वादी व प्रतिवादी यांच्या जमीनीची मोजणी करून हददी कायम करण्याकरीता तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांची नेमणूक करण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, वादी व प्रतिवादी हे आपसात सख्खे भाउ आहेत. सदर दावा मालकी घ ोषीत करून चिरकाल मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी यांनी मौजे वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील जमीन गट क्र. ७९६ मधील प्रत्येकी ० हे. ४७ आर जमीन दिलीप मनोहर नागरगोजे यांच्याकडून दिनांक १०.०१.२०२४ रोजी दोन वेगवेगळया खरेदीखताआधारे खरेदी केलेली असुन खरेदीखता आधारे सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करून ७/१२ अभिलेखात वादीचे नावाची ० हे. ४७ आर क्षेत्राची स्वतंत्र मालक म्हणून नोंद घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादीच्या नावाची ० हे. ४७ आर क्षेत्राचा स्वतंत्र मालक म्हणून ७/१२ अभिलेखात नोंद घेण्यात आली आहे. मौजे वरवटी ता. अंबाजोगाई येथील जमीन गट क्र. ७९६ मधील वादीच्या मालकीची ० हे. ४७ आर जमीनीच्या पूर्वेस योगीराज चाटे यांची जमीन, पश्चिमेस भास्कर फड यांची जमीन, दक्षिणेस प्रतिवादीची याच गटातील ०हे. ४७ आर जमीन, उत्तरेस पुष्पा फड यांची जमीन व प्रतिवादीची याच गटातील ० हे. ४७ आर जमीन

असुन त्याच्या पूर्वेस योगिराज चाटे व पुष्पा फड यांची जमीन, पश्चिमेस भास्कर फड यांची जमीन, दक्षिणेस केरबा मुंडे यांची जमीन व उत्तरेस याच गटातील वादीची ०हे. ४७ आर जमीन आहे.

३. वादी व प्रतिवादी यांचा वाद कायमचा मिटणेकामी वादी व प्रतिवादी यांच्या जमीनीचीवाटणी करून त्यांच्या हददी कायम नकाशा मागवणे उचीत व योग्य आहे. सदरील मोजणी होवून हददी कायम करून नकाशा मागवून घेतल्यानंतर वादी व प्रतिवादीयांच्यात कसलाही वाद राहणार नाही व वादीस प्रतिवादीचे विरूध्द प्रस्तुतचा दावा चालवण्याची गरज राहणार नाही. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्या जमीनीची मोजणी करणेकरिता तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांचे सदर प्रकरणी कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्याची विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीने सदर दावा मालकी घोषीत करून चिरकाल मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केल्याचे दिसून येते. वादी व प्रतिवादी यांच्यातील मिळकतीबाबतचा वाद संपुष्टात आणण्याकरिता वादमिळकतीची मोजणी तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांचेमार्फत करणे आवश्यक व संयुक्तिक आहे. करिता खालील प्रमाणे आदेश.

| **आदेश** | |
|---|---|
| **१.** | अर्ज नि. ११ मंजुर करण्यात येतो. |
| **२.** | तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांची कोर्ट कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात येते. त्यांना निर्देशित करण्यात येते की, |

| | |
|---|---|
| | मौजे वरवटी, ता. अंबाजोगाई, जि. बीड येथील जमीन गट क्र. ७९६ मधील ० हे. ४७ आर ची नियमाप्रमाणे मोजणी करून हद्दीखुणा कायम कराव्या. |
| ३. | वादी व प्रतिवादी यांनी कमीशन फीस भरावी. |
| ४. | तालुका निरीक्षक भुमी अभिलेख अंबाजोगाई यांनी दोन्ही पक्षकारांना पुर्व नोटीस देवून कमीशनचे काम करावे व त्याचा अहवाल लवकरात लवकर न्यायालयात दाखल करावा. |
| ५. | वदी व प्रतिवादी यांनी प्रोसेस फीस भरल्यानंतर कमीशन रीट पाठविण्यात यावी. |

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2025.03.20 17:59:12 +0530

ठिकाण : अंबाजोगाई

दिनांक : २०.०३.२०२५

**( बा. ना. गोडबोले )**
३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
अंबाजोगाई.

:: **<u>Certificate of Stenographer</u>** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Order."

Dictated On : 20/03/2025.
Transcribed On : 20/03/2025.
Checked & Signed On : 20/03/2025.
Date : 20/03/2025.
Place : Ambajogai.

Digitally signed by GANGANE ANKUSH SADASHIV
Date: 2025.03.20 18:00:49 +0530

Sd/-
**( A.S.Gangane )**
Steno
3 rd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ambajogai.